# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२०१२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १७/०२/२०१२ रोजी सभा सुचना क्र. २३ दि. १०/०२/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १२. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १३. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| १४. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १५. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १६. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १७/०२/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २३, दि. १०/०२/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १२८, दि. १६/०१/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**भगवती शर्मा :-**

दि. १६/०१/२०१२ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२८ :-**

दि. १६/०१/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १११ :-**

दि. १६/०१/२०१२ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९, त्रैमासिक जमा-खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, ऑडीटर आलेले आहेत का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

नाही आले.

**अनिल सावंत :-**

जमा खर्च आढावा आहे ना. मग ऑडीटर पाहिजे ना. त्याच्यामध्ये होर्डीग्जचा विषय आहे. २.५ करोडचे आपले बजेट प्रोव्हीजन होते. होर्डीग्जची फी आपण ॲडवान्समध्ये घेतो ना?

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो. हे त्या डिपार्टमेन्टकडून ज्या रक्कमा जमा झालेल्या आहेत त्या जमा करुन घेतलेल्या आहेत. त्याचा त्रैमासिक म्हणजे डिसेंबर अखेरपर्यंत किती जमा झालेले आहे ते दाखवण्यात आलेले आहे.

**अनिल सावंत :-**

जाहिरात डिपार्टमेंटच्या अधिका-यांना विचारा ना. होर्डिग्जचे तर ॲडवान्समध्ये आपण घेतो दिल्यानंतर.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

डिसेंबरच्या नंतर झालेले आहे आणि या फिगर आलेले आहते ते डिसेंबर पर्यंतचे आहेत.

**अनिल सावंत :-**

डिसेंबरच्या नंतर जमा झालेले आहे. त्यामध्ये डिफॉल्टर कोणी आहे का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

डिफॉल्टर कोणी नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती मॅडम, एक मोकळ्या जागेवरील कर, मध्यंतरी मी प्रशासनाजवळ विचारणा केली तेव्हा १६ कोटी रुपयाची बिल अदा केलेली. परंतु, याचा जो जमा आहे ५६ लाख रु. पर्यंतच झालेले आहे. मग ती बिल दिलेली तर त्याच्यावर मागणी केलेली की नाही? प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो. ५६ लाख रु. बॅलन्स आहे. बजेट प्रोव्हिजन होती ४ करोड रुपये त्यापैकी डिसेंबर पर्यंत ३ कोटी ३४ लाख ५७ हजार रुपये वसुल झालेले आहे. तो बॅलन्स दाखवलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

बॅलन्स दाखवला ते बरोबर आहे. १६ कोटीची आम्ही मध्यंतरी चर्चा केली होती. १६ कोटीचे बिल अदा केलेले आहे आणि वसुली झाल्यानंतर इथे फिगर वाढवायला पाहिजे होते. ५६ बाकी आहेत तर वाढवायला पाहिजे होते.

**शरद बेलवटे :-**

सर, हे लास्ट टाईमचे बजेट एस्टीमेटचे जे पकडले आहे ते ४ कोटी पकडून चालले होते. त्यांची आता काही डिमांड असेल तर तुमच्यापुढे जे बजेट येईल ते रिवाईज करायला लागेल.

**शशिकांत भोईर :-**

बजेट अंदाजित आहे ना. तुम्ही १६ कोटीची बिल दिली हे ह्या सभागृहाला सांगितलेले आहे.

**शरद बेलवटे :-**

बजेट अंदाजित असेल तर, मा. महासभेने मंजूर केलेले आहे. त्याच्यामध्ये आपल्याला बदल करता येणार नाही. यावेळेला ते स्टॅन्डीगकडे रिवाईज करुन घेतलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझे असे प्रशासनानला म्हणणे आहे की, ज्यावेळी आपण जादा वसुली करतो. तर मायनसने दाखवतो ना. मग तेव्हा तुम्ही बजेटपेक्षा जास्त जमा केलेले दाखवता. जर बिल अदा केलेले आहे तर तुमची जास्त वसुली का झालेली नाही? माझा तो प्रश्न आहे.

**शरद बेलवटे :-**

डिसेंबर नंतर काय वसुली झाली असेल तर सांगता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन २००८ मध्ये ठराव झालेला होता. २००८-०९, २००९-१०, २०१०-११ या तीन वर्षामध्ये एकूण मागणी किती होती?

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती मॅडम, त्याच्यामध्ये दुसरा प्रश्न मार्गस्थ फी एस्कॉट, आपण त्याची वसुली करण्यासाठी मंजुरी दिलेली त्याला शासन मंजुरी घेणे गरजेचे होते. त्याबाबत कुठे अडकले? एक वर्ष तर गेले. आता आपण फिगर २१ कोटीची दाखवली ती तशीच राहणार का? यामध्ये प्रशासनाने काय कारवाई केली?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, प्रशासनाने त्याचा सातत्याने कॉलो-अप केलेला आहे. पहिले आपल्याला गेल्यावर्षीच्या साधारणतः जुलैमध्ये एन.एच.-८ ची परवानगी मिळाली, एन.ओ.सी. मिळाली. त्याच्यानंतर दोन ठिकाणी टोल नाके असायला पाहिजे. हे कशाला पाहिजे, व्हाया अहमदाबाद, मुंबई किंवा मुंबई-अहमदाबाद असे जाण्यासाठी हेव्ही व्हेहीकल्स, आणि दुसरी घोडबंदर रोडला एम.एस.आर.डी. ची परवानगी गेल्या महिन्यातच मिळाली आणि आता अवेटेड आहे. ती ट्राफीक पोलीसची परवानगी. ट्राफीक पोलीसांची गेल्या सोमवारी मिटींग झाली. त्यावेळी ट्राफीक पोलीसांनी काही अटीवर परवानगी देण्याचे फक्त आम्ही एन.एच.-८ वर देवू. एम.एस.आर.डी. ने जरी परवानगी दिली असेल तरी आम्ही तिथे देणार नाही अशी भूमिका घेतली. त्याच्यावर त्यांचे श्री. नागेश लोहार साहेब, डी.वाय.एस.पी. जे आहेत आणि कोणार्क कॉर्पोरेशचे अधिकारी त्यांची एक जॉईन्ट मिटींग पुढच्या आठवड्यामध्ये मंगळवार किंवा बुधवारी होईल. तद्‌नंतर ट्राफीक पोलीस त्यांचे क्लेरन्स देईल. एम.एस.आर.डी.सी. ने आली एन.ओ.सी. देताना त्यांनी ड्रॉईंग दिलेले आहे. त्याच्यामध्ये फाऊंटन हॉटेलपासून नाक्या पर्यंत रस्त्याच्या डाव्याबाजुला टूवर्डस ठाणे एक बस वे करायला त्यांनी सांगितले आहे. त्याचें म्हणणे आहे, बस वे आम्ही तिथून केला आणि तिथून राईटला वळून वाहन गेले आणि नाक्यापर्यंत गेले तर त्या रस्त्याला म्हणजे अहमदाबाद वरुन, विरार वरुन येणारा ट्राफीक तिथून टर्न करणार आहे आणि याबाजुने मुंबईकडून जाणारा ट्राफीक हा पूर्ण तिथे ब्लॉक होईल. तिथे जे किमान ५० मिटरचे क्लीयरन्स पाहिजे, गाड्यांना वळवायला तेवढा तिथे मिळत नाही. म्हणजे फाऊंटन हॉटेलपासून ते नाक्यापर्यंत. त्यामुळे त्या अटीवर त्यांनी अजूनपर्यंत एन.ओ.सी. ही विथॉड केलेली आहे. आमचा सातत्याने त्याच्यावर पाठपुरावा चालु आहे. तथापी त्याच्यामधुन काही मध्यम मार्ग निघतो किंवा कसे हे आपण पुढच्या आठवड्यामध्ये जज करु आणि जर क्लीयरन्स झाला तर लवकरात लवकर एस्कॉटची वसुली सुरु होईल.

**शशिकांत भोईर :-**

अनधिकृत बांधकाम तोडफोड वसुली त्यावेळी श्री. किरण राठोड म्हणून अधिकारी होते. त्यावेळी त्यांनी पण बिल अदा केलेली. अनधिकृत बांधकाम तोडलेली होती. त्यांना नंतर विचारणा केल्यानंतर आम्ही एवढी एवढी बिल दिलेली आहे. त्याच्यामध्ये १ कोटी ६६ लाख आणि जसे त्यांनी जेवढी बिल दिलेली तेवढीही वसुली होत नाही. मग अनधिकृत बांधकाम मिरा भाईंदरमध्ये होतात की नाही? जर आपली वसुली होत नाही हे नक्की. मग जी आता कारवाई करता ती कोणती कोणती बांधकाम आहेत?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

अनधिकृत बांधकामाची जी आपण वसुली करतो २६७(अ) नुसार जी शास्ती या कारवाईची आपल्याला अर्थसंकल्पीय तरतुद ३ कोटीची होती. पैकी ८७ लाख ६७ हजार डिसेंबर अखेरीस वसुल झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही शास्तीबद्दल बोलत आहात. अनधिकृत बांधकाम आहे. २८७, सहा नंबरवर..............

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

तोडणे वसुलीची सुध्दा ८ लाख ६७ हजार रु. वसुली झालेली आहे. हा जो मॅक्झीमम जो बॅलन्स आहे हा त्यांना आपण दिला आहे. कर विभागाकडून देयक पाठवली आहे. यासर्व लोकांना आणि ती देयक त्यांच्याकडून कर विभागाकडून अपेक्षित आहेत. मालमत्ता कराची थकबाकी आपण दाखवतो. त्यांच्याकडून त्या पध्दतीने वसुल करतो. ती जी वसुली आहे ती एक्च्युअली कर विभागाने करायची आहे. कर विभागाकडे आपण कळवतो की आपण त्यांना एवढी एवढी शास्ती लावलेली आहे. त्याला आलेला खर्च आणि तोडणे वसुली आणि ती त्यांच्याकडून आपण देयक पाठवतो त्यांची.

**लक्ष्मण जंगम :-**

साधारणतः किती वर्षाची बॅलन्स आहे त्यांची? कारण मागच्या वेळेला आपण चर्चा केली होती त्यावेळेला ३-४ वर्षाची होती.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

३-४ वर्षाची बॅलन्स आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

साधारणतः किती वर्षामध्ये वसुली होणे अपेक्षित असते किंवा ते बंधनकारक आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

जास्तीत जास्त दोन वर्षात वसुली होणे अपेक्षित आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

४ वर्ष ऑलरेडी होवून गेले आहेत.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आपण याच वर्षी त्याच्याबद्दल पक्की देयक पाठवलेली आहेत. आपण चारही वॉर्ड अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत की, त्यांनी ती प्रायोरिटीवर वसुली करावी म्हणून. तसे नसेल तर त्यांच्यावर जी काही दंडनिय कारवाई आहे, महसुल अधिनियमाप्रमाणे, लेखासाहित्या प्रमाणे त्या पध्दतीने त्यांच्याकडून वसुल केलेली आहे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती मॅडम, कारखाने, दुकाने परवाना लायसन्स फी ते बंद झालेले आहे का? परवाने देत नाहीत.

**विजया गंभीरराव :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलते, परवाना देण्याचे काम आता कर विभागाकडे दिलेले आहे. त्यामुळे ते लोकांचे काम चालू आहे.

**एस. ए. खान :-**

कर विभाग म्हणजे कसे काय? काय सिस्टम आहे?

**विजया गंभीरराव :-**

कर विभाग, लिपीक आणि कर निरिक्षकांना दिलेला आहे.

**एस. ए. खान :-**

माहिती पब्लीकला दिलेली आहे की, कर विभागाकडे परवानगी मिळते.

**विजया गंभीरराव :-**

हो. सगळे येतात त्यांना सांगितलेले आहे.

**एस. ए. खान :-**

बोर्ड वगैरे लावलेले आहेत का?

**विजया गंभीरराव :-**

बोर्ड वगैरे नाही. पण माझ्याकडे येतात त्यांना मी सांगते.

**एस. ए. खान :-**

आपले उत्पन्न आहे. तुम्ही सांगता म्हणजे, एक एक माणसांना सांगत राहतात का? ह्याच्यामध्ये किती तरतुद आहे. मा. सभापती मॅडम, कर विभागाला किती लिपीक आहेत? कुठे आहेत? प्रभागामध्ये दिलेले आहे का?

**विजया गंभीरराव :-**

जिम्मेदारी प्रभाग कार्यालयाला दिलेली नाही अजून.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती मॅडम, पान क्र. ३ वर ५ नंबरचा आणि १४ नंबरचा मुलभुत सुविधा व अनुदान.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन २०११-२०१२ आर्थिक वर्षातील माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०११-२०१२ आर्थिक वर्षातील माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे. सदस्यांनी खुली जागा कर बाबत विचारलेले पुढील स्थायी समिती सभेत संबंधीत विभागाने अनुपालन अहवाल देऊन खुलासा करावा.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

आमचा पण ठराव आहे. सन २०११-१२ चे मंजूर अंदाजपत्रकानुसार माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ अखेर अंदाजपत्रकीय तरतुद व त्यानुसार झालेली प्रत्यक्ष जमा व त्या प्रमाणात झालेला प्रत्यक्ष खर्च याबाबतची तपासणी अंतर्गत लेखापरिक्षण विभागाने केलेली असून त्या सबंधीत अवलोकनार्थ त्रैमासिक लेखे ठेवण्यात येत आहेत. परंतु, त्या विषयी कोणतीही चर्चा झालेली नसून सदर विषयाच्या मंजूरीला विरोध आहे असा ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९ करीता दोन ठराव आलेले आहेत. तर त्यासाठी मतदान घेण्यात येत आहे. अनक्रमे मी दुसरा ठराव वाचत आहे. सुचक श्री. अनिल सावंत व अनुमोदक श्री. एस. ए. खान सन २०११-१२ चे मंजूर

अंदाजपत्रकानुसार माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ अखेर अंदाजपत्रकीय तरतुद व त्यानुसार झालेली प्रत्यक्ष जमा व त्या प्रमाणात झालेला प्रत्यक्ष खर्च याबाबतची तपासणी अंतर्गत लेखापरिक्षण विभागाने केलेली असून त्या सबंधीत अवलोकनार्थ त्रैमासिक लेखे ठेवण्यात येत आहेत. परंतु, त्या विषयी कोणतीही चर्चा झालेली नसून सदर विषयाच्या मंजूरीला विरोध आहे असा ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात कोण असेत त्यांनी हात वर करायचे आहेत. आता मी पहिल्या ठरावाचे वाचन करतो. सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदक श्री. भगवती शर्मा सन २०११-२०१२ आर्थिक वर्षातील माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०११-२०१२ आर्थिक वर्षातील माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे. सदस्यांनी खुली जागा कर बाबत विचारलेले पुढील स्थायी समिती सभेत संबंधीत विभागाने अनुपालन अहवाल देऊन खुलासा करावा. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात कोण असेत त्यांनी हात वर करायचे आहेत. मॅडम, दोन्ही ठरावाला समसमान मते पडलेली आहेत. तर आपले मत कोणाला आहे?

**मा. सभापती :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या ठरवाच्या बाजुने मी माझे मतदान करीत आहे. तसेच श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या बाजुन ९ मते पडलेली आहेत. तर त्यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२९ :-**

त्रैमासिक जमा-खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ११२ :-**

सन २०११-२०१२ आर्थिक वर्षातील माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०११-२०१२ आर्थिक वर्षातील माहे १ ऑक्टोबर २०११ ते ३० डिसेंबर २०११ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे. सदस्यांनी खुली जागा कर बाबत विचारलेले पुढील स्थायी समिती सभेत संबंधीत विभागाने अनुपालन अहवाल देऊन खुलासा करावा.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल          अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | १) श्री. शशिकांत भोईर | निरंक |
| २) श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | २) श्री. जुबेर इनामदार | |
| ३) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | ३) श्री. एस. ए. खान | |
| ४) श्री. भगवती शर्मा | ४) श्री. अनिल सावंत | |
| ५) श्रीम. नर्मदा वैती | ५) श्री. लक्ष्मण जंगम | |
| ६) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | ६) श्रीम. मर्लिन डिसा | |
| ७) श्री. मोहन जाधव | ७) श्री. पुरोहित मधुसुदन | |
| ८) श्री. बर्नड डिमेलो | ८) श्रीम. नयना म्हात्रे | |
| ९) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे (सभापती) - कास्टींग वोट | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३०, प्रभाग समिती निहाय साफसफाई कामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

महापालिका आरोग्य विभागाने सादर करण्यात आलेल्या गोषवा-यात खालील गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही.

१. महापालिकेतर्फे सर्व वॉर्डनिहाय स्वच्छता आराखडा तयार करताना गटाराची, रस्त्यांच्या लांबी-रुंदीचे मोजमाप घेतलेले आहे. तसेच मिरा भाईंदर भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गाळे

असून त्यातुन ब-याच प्रमाणात कचरा निघत आहे. दिलेल्या गोषवा-यामध्ये वॉर्ड निहाय किती कामगार देणार आहेत याचा उल्लेख केलेला नाही.

२. गोषवा-यामध्ये वाटाघाटी करताना अटी क्र. ४ मध्ये कामे करताना समाधानकारक न झाल्यास दंड लावणे ऐवजी दोन तासाची मुदत देऊन काम पूर्ण करण्यास निविदा धारकास कळवले आहे. या बाबत प्रशासनाची भुमिका स्पष्ट नाही.

३. मागील सन २००९-२०१० साफसफाई ठेक्यामध्ये कच्चे पक्के नाले पावसाळ्यापुर्वी साफ करणे, खोदाई करणे यावेळी सहा कामे या निविदेत वगळण्यात आली. याबाबत प्रभागातील खुलासा गोषवा-यात दिलेला नाही.

४. निविदा मंजुर केल्यानंतर ठेकेदाराबरोबर होणारा करारनाम्यामध्ये अनेक दोष व त्रुटी असतात ती बाब स्थायी समिती समोर स्पष्ट होत नाही. त्यामुळे नंतर काही बाबतीत गैरसमज निर्माण होतो. तरी निविदा मंजुर करताना करारनामा गोषवारासह द्यावा.

तरी वरील बाबींचा संपुर्ण गोषवारा सादर करावा व सदरचा विषय स्थायी समिती मध्ये पुर्ण माहितीसह सादर करावा अशा ठराव मांडीत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे आहे त्या निविदा परत स्थायी समिती समोर.........

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३० :-**

प्रभाग समिती निहाय साफसफाई कामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ११३ :-**

महापालिका आरोग्य विभागाने सादर करण्यात आलेल्या गोषवा-यात खालील गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही.

१. महापालिकेतर्फे सर्व वॉर्डनिहाय स्वच्छता आराखडा तयार करताना गटाराची, रस्त्यांच्या लांबी-रुंदीचे मोजमाप घेतलेले आहे. तसेच मिरा भाईंदर भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गाळे असून त्यातुन ब-याच प्रमाणात कचरा निघत आहे. दिलेल्या गोषवा-यामध्ये वॉर्ड निहाय किती कामगार देणार आहेत याचा उल्लेख केलेला नाही.

२. गोषवा-यामध्ये वाटाघाटी करताना अटी क्र. ४ मध्ये कामे करताना समाधानकारक न झाल्यास दंड लावणे ऐवजी दोन तासाची मुदत देऊन काम पूर्ण करण्यास निविदा धारकास कळवले आहे. या बाबत प्रशासनाची भुमिका स्पष्ट नाही.

३. मागील सन २००९-२०१० साफसफाई ठेक्यामध्ये कच्चे पक्के नाले पावसाळ्यापुर्वी साफ करणे, खोदाई करणे यावेळी सहा कामे या निविदेत वगळण्यात आली. याबाबत प्रभागातील खुलासा गोषवा-यात दिलेला नाही.

४. निविदा मंजुर केल्यानंतर ठेकेदाराबरोबर होणारा करारनाम्यामध्ये अनेक दोष व त्रुटी असतात ती बाब स्थायी समिती समोर स्पष्ट होत नाही. त्यामुळे नंतर काही बाबतीत गैरसमज निर्माण होतो. तरी निविदा मंजुर करताना करारनामा गोषवारासह द्यावा.

तरी वरील बाबींचा संपुर्ण गोषवारा सादर करावा व सदरचा विषय स्थायी समिती मध्ये पुर्ण माहितीसह सादर करावा अशा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३१, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांना मुदतवाढ देणेबाबत.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्या अधिका-यांना आपण मुदतवाढ देणार आहोत ते सध्या कार्यरत आहेत का? त्यांची मुदत कधी संपते? किंवा कधी संपली की संपणार आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, त्यांची मुदत संपली दि. ३०/११/२०११ ला परंतु, त्यांचा आपण आता विषय घेत आहोत. त्यांना परत मुदतवाढ देण्यासाठी त्याला विलंब झाला कारण त्याची फाईल डिले झाली होती. त्यामुळे उशिर झाला.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे अपघात कक्ष ‘‘वैद्यकिय अधिकारी’’ या पदावर रु. २५,०००/- या ठोक मानधनावर डॉ. विजया प्रभाकर आहिरे, यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने जा.क्र.मनपा/वैद्यकिय/४४२/११-१२,दि. ३१/५/२०११ चे आदेशानुसार दि. ०१/०६/२०११ पासुन सहा महिन्याचे कालावधीसाठी नेमणुक झालेली आहे.

दि. ३१/०५/२०११ चे आदेशानुसार डॉ. विजया प्रभाकर आहिरे, वैदकिय अधिकारी यांचा सहा महिन्याचा कालावधी दि. ३०/११/२०११ रोजी संपत असुन वैद्यकिय अधिकारी यांचे काम समाधानकारक असल्याबाबत भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथील वैद्यकिय अधिक्षक यांनी पत्रान्वये कळविले आहे. तसेच प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकिय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने सदर अपघात कक्ष वैद्यकिय अधिकारी यांना मुदतवाढ देण्यासाठी शिफारस केली आहे.

वैद्यकिय सेवा ही अत्यावश्यक सेवा पाहता भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय वैद्यकिय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने डॉ. विजया प्रभाकर आहिरे, अपघात कक्ष, वैद्यकिय अधिकारी यांची दि. ३०/११/२०११ रोजी मुदत संपत असल्याने दोन दिवसाचा तांत्रिक सेवा खंड करुन फेर ठोक मानधनावर वैद्यकिय अधिकारी या पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार सहा महिन्याची मुदतवाढ देणेस हि सभा मंजूरी देत आहे.

**मोहन जाधव :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १३१ :-**

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांना मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ११४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे अपघात कक्ष ‘‘वैद्यकिय अधिकारी’’ या पदावर रु. २५,०००/- या ठोक मानधनावर डॉ. विजया प्रभाकर आहिरे, यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने जा.क्र.मनपा/वैद्यकिय/४४२/११-१२,दि. ३१/५/२०११ चे आदेशानुसार दि. ०१/०६/२०११ पासुन सहा महिन्याचे कालावधीसाठी नेमणुक झालेली आहे.

दि. ३१/०५/२०११ चे आदेशानुसार डॉ. विजया प्रभाकर आहिरे, वैदकिय अधिकारी यांचा सहा महिन्याचा कालावधी दि. ३०/११/२०११ रोजी संपत असुन वैद्यकिय अधिकारी यांचे काम समाधानकारक असल्याबाबत भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथील वैद्यकिय अधिक्षक यांनी पत्रान्वये कळविले आहे. तसेच प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकिय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने सदर अपघात कक्ष वैद्यकिय अधिकारी यांना मुदतवाढ देण्यासाठी शिफारस केली आहे.

वैद्यकिय सेवा ही अत्यावश्यक सेवा पाहता भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय वैद्यकिय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने डॉ. विजया प्रभाकर आहिरे, अपघात कक्ष, वैद्यकिय अधिकारी यांची दि. ३०/११/२०११ रोजी मुदत संपत असल्याने दोन दिवसाचा तांत्रिक सेवा खंड करुन फेर ठोक मानधनावर वैद्यकिय अधिकारी या पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार सहा महिन्याची मुदतवाढ देणेस हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेला अनुमोदन :- श्री. मोहन जाधव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३२, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(अअ) नुसार ‘‘पाणी पुरवठा लाभ कर’’ लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ३०.०० द.ल.लि. असा एकूण सरासरी ११६

द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर शहराचा विकास झपाटयाने होत आहे. विकासाच्या ओघात येथील लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. या लोकसंख्येस पुरेसा पाणी पुरवठा करणेसाठी उपलब्ध असलेले पाणी कमी पडत आहे. सद्यस्थितीत शहरास मिळणारे पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. सदर पाणी उपलब्ध झाल्यास पाणी पुरवठा लाभ कर लावणे योग्य होईल. तरी वरीलप्रमाणे "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याचा ठराव ही सभा नामंजूर करीत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ११५ :-**

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ३०.०० द.ल.लि. असा एकूण सरासरी ११६ द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर शहराचा विकास झपाटयाने होत आहे. विकासाच्या ओघात येथील लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. या लोकसंख्येस पुरेसा पाणी पुरवठा करणेसाठी उपलब्ध असलेले पाणी कमी पडत आहे. सद्यस्थितीत शहरास मिळणारे पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. सदर पाणी उपलब्ध झाल्यास पाणी पुरवठा लाभ कर लावणे योग्य होईल. तरी वरीलप्रमाणे "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याचा ठराव ही सभा नामंजूर करीत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानूमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३३, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ३०.०० द.ल.लि. असा एकूण सरासरी ११६ द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर शहराचा विकास झपाटयाने होत आहे. विकासाच्या ओघात येथील लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. या लोकसंख्येस पुरेसा पाणी पुरवठा करणेसाठी उपलब्ध असलेले पाणी कमी पडत आहे. सद्यस्थितीत शहरास मिळणारे पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. सदर पाणी उपलब्ध झाल्यास पाणी पुरवठा लाभ कर लावणे योग्य होईल. तरी वरीलप्रमाणे वाढीव नळ जोडणी शुल्क व इतर लागू करण्याचा ठराव ही सभा नामंजूर करीत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. ११६ :-**

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ३०.०० द.ल.लि. असा एकूण सरासरी ११६ द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर शहराचा विकास झपाटयाने होत आहे. विकासाच्या ओघात येथील लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. या लोकसंख्येस पुरेसा पाणी पुरवठा करणेसाठी उपलब्ध असलेले पाणी कमी पडत आहे. सद्यस्थितीत शहरास मिळणारे पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. सदर पाणी उपलब्ध

झाल्यास पाणी पुरवठा लाभ कर लावणे योग्य होईल. तरी वरीलप्रमाणे वाढीव नळ जोडणी शुल्क व इतर लागू करण्याचा ठराव ही सभा नामंजूर करीत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेला अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३४, केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) अंर्तगत विशेष स्वच्छताकर वसुल करणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (J.N.N.U.R.M) अंर्तगत मिरा भाईंदर महानगरपालिकेने रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंर्तगत मेमोरॅंडम ऑफ़ अंडस्टॅंडिंग (M.O.U.) अंर्तगत उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महापालिकेने दिलेली आहे.

| अ.क्र | इमारत प्रकार | वापराचा प्रकार | प्रस्तावित कर |
|---|---|---|---|
| १ | निवासी मालमत्ता | बैठी घरे, इमारती, | रेटेबल व्हॅल्युच्या ४% |
| २ | बिगर निवासी | हॉटेल्स, खानावळी, मटन चिकन शॉप, रेस्टॉरंन्ट, मिठईची दुकाने, आईसक्रिम पार्लर, फ़ास्टफुड विक्री दुकाने, चायनिज सेन्टर, | रेटेबल व्हॅल्युच्या ७% |
| ३ | बिगर निवासी (जादा प्रमाणात निर्माण होणारा घनकचरा) | मल्टीप्लेक्स, शॉपिंग सेन्टर, तबेले, मॉल, कॉल सेन्टर, मंगल कार्यालये, बफिंग उद्योग धंदे, रिसॉर्ट, क्लब, बार | रेटेबल व्हॅल्युच्या १०% |

मा. स्थायी समितीतर्फे वर नमुद केलेले प्रस्तावीत विशेष स्वच्छता कर विविध आस्थापनांना लागु करणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३४ :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) अंर्तगत विशेष स्वच्छताकर वसुल करणेबाबत.

**ठराव क्र. ११७ :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (J.N.N.U.R.M) अंर्तगत मिरा भाईंदर महानगरपालिकेने रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंर्तगत मेमोरॅंडम ऑफ़ अंडस्टॅंडिंग (M.O.U.) अंर्तगत उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महापालिकेने दिलेली आहे.

| अ.क्र | इमारत प्रकार | वापराचा प्रकार | प्रस्तावित कर |
|---|---|---|---|
| १ | निवासी मालमत्ता | बैठी घरे, इमारती, | रेटेबल व्हॅल्युच्या ४% |
| २ | बिगर निवासी | हॉटेल्स, खानावळी, मटन चिकन शॉप, रेस्टॉरंन्ट, मिठईची दुकाने, आईसक्रिम पार्लर, फ़ास्टफुड विक्री दुकाने, चायनिज सेन्टर, | रेटेबल व्हॅल्युच्या ७% |
| ३ | बिगर निवासी (जादा प्रमाणात निर्माण होणारा घनकचरा) | मल्टीप्लेक्स, शॉपिंग सेन्टर, तबेले, मॉल, कॉल सेन्टर, मंगल कार्यालये, बफिंग उद्योग धंदे, रिसॉर्ट, क्लब, बार | रेटेबल व्हॅल्युच्या १०% |

मा. स्थायी समितीतर्फे वर नमुद केलेले प्रस्तावीत विशेष स्वच्छता कर विविध आस्थापनांना लागु करणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात फी चे दर वाढविणेबाबत. (दर निश्चित करणेबाबत)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ आणि ३९२ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम -२००३ अन्वये जाहिराती व आकाशचिन्ह इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतूद आहे.

त्या अनुषंगे मिरा भाईदर क्षेत्रातील जाहिरातीवरील (जाहिरात फलक,आकाशचिन्ह (होर्डिग्ज), कमानी, किऑस्क, तसेच, व्यापारी /जाहिरात आस्थापनेवरील जाहिराती निऑन साईन, ग्लोसाईन इत्यादी तसेच बँका, दुकानांवरील जाहिरात फलक, तसेच मॉल, शोरुम,पेट्रोल पंप इत्यादी व्यावसायिक ठिकाणांवर प्रदर्शित करण्यात येणा-या जहिराती व अन्य प्रकारच्या जाहिराती) जाहिरात फी चे दर हे मा.स्थायी समिती ठराव क्र.४३, दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३५,दि.१९/०३/२००८ अन्वये सन २००८-०९ मध्ये मंजुरी दिलेल्या दरातील तक्त्यामधील अ.क्र. १,२,३,५,६,७,८,१०,११,१२ मध्ये नमुद केलेल्या जाहिरात दरामध्ये वाढ करण्यात येत नाही. परंतु तक्त्यातील अ.क्र. ४,९,१३,१४ व १५ मध्ये वाढ पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.
त्याचा तक्ता खालीलप्रमाणे.

**दि.०१/०४/२०१२ पासून लागू करण्यात आलेले जाहिरात फी चे दरपत्रक**

**(अ)** **तक्ता**

| **अ.क्र** | **जाहिरातीचे प्रकार** | **मोजमाप** | | |
|---|---|---|---|---|
| | | | **प्रति चौ.फुट प्रति महिना** | **वार्षिक** |
| १ | इमारतीच्या भितींवरील जाहिरात (लिखाण) | १० चौ.फुटापर्यंत<br>१० चौ.फुटावरील | रु.४/-<br>रु.३/- | रु.४८/-<br>रु.३६/- |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यंत | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ.फुटावरील | रु.३/- | रु.३६/- |
| ३ | कागदी पोस्टर्स | | | |
| | अ) सिनेमा व व्यापारी | १० चौ.फुटापर्यंत (एका नगास) | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.१०/- | रु.१२०/- |
| | ब) इतर | १० चौ.फुटापर्यंत (एका नगास) | रु.२/- | रु.२४/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.४/- | रु.४८/- |
| ४ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | १) १.५x २.५ प्रति गौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.९००/- प्रति महिना प्रति पोल (सर्व आकारमाना करीता) | रु.१०८००/- |
| | | २) २.५x ३.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | प्रति महिना/ प्रति पोल (सर्व आकारमाना करीता) | |
| | | ३) २.५x ५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | | |
| ५ | दुकानांवरील नावाचे फलक | | निरंक | निरंक |
| | | | निरंक | निरंक |
| ६ | दुकानांवरील जाहिरातीचे फलक | १० चौ.फुटापर्यंत | रु.३/- | रु.३६/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ११ चौ.फुट ते २० चौ.फुट | रु.४/- | रु.४८/- |
| | | २० चौ .फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| ७ | भिंतीवरील जाहिरात<br>(लिखाण व चित्र) | १० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ८ | वाहनांवरील जाहिरात | १० चौ.फुटापर्यत | रु.१०/- | रु.१२०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ९ | होर्डिग्ज (आकाशचिन्ह)/<br>(मोठे जाहिरात फलक)<br>(खाजगी जागेत) | २०० चौ.फुटापर्यत | रु.६/- | रु.७२/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुट | रु.५.५०/- | रु.६६/- |
| | | ३०० चौ .फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| १० | बस थांब्यावरील जाहिराती | १ चौ.फुटास | रु.४/- | रु.४८/- |
| ११ | रोड शोज | रस्त्यावर १० ठिकाणापर्यत<br>(प्रति नगास रु.१००) | रु.१००० प्रतिदिन/प्रती रस्ता | |
| | | आकाशातील प्रदर्शन | रु.५००/- प्रती शो | |
| | | एरियल बॅनर्स | रु.५०००/-<br>प्रतीदिन/बॅनर | |
| | | रस्त्यावर हॅडबिल टाकणे/वाटणे | रु.१२५/-प्रति हजारी नग | |
| | | रस्त्यावरील लिखाण | रु.२/- प्रति चौ.फुट प्रति महिना | |
| १२ | चल जाहिरात (च्र्ब्द्यत्ध्त्य्ञत्दृद) किंवा इलेक्ट्रॉनिक्स स्क्रोलर जाहिरात | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | क्र.६ प्रमाणे<br>(प्रत्येक जाहिरातीस) | |
| १३ | चलत जाहिरात<br>(एल.ई.डी.एल.सी.डी.माधमातून उभारलेले जाहिरात फलक)<br>**(ग्दृध्त्दढ़ ड्ढड्ढध्ड्ढद्धद्यत्ञड्ढश्र्ड्ढदद्य ण्ड्ढध्त्दढ़ श्र्द्धथ्द्यत्द्रथ्ड्ढ ड्ढत्ञद्रथ्ड्ढ)** | १ ते २०० चौ.फुटापर्यत | रु.३५०/- प्रति दिन | |
| | | २०० ते ३०० चौ.फुटापर्यत | रु.३००/- प्रति दिन | |
| | | ३०० चौ.फुटावरील | रु.२५०/- प्रति दिन | |
| १४ | कमानी (कायम स्वरुपी खाजगी जागेत) | १ ते २०० चौ.फुटापर्यंत | रु. ६/- | रु. ७२/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुटापर्यंत | रु. ५.५०/- | रु. ६६/- |
| | | ३०० चौ. फुटावरती | रु. ५/- | रु. ६०/- |
| १५ | होर्डिग्ज (आकाशचिन्ह)<br>मोठे जाहिरात फलक<br>(महापालिका जागेवरती) | २०० फुटापर्यंत | रु. १०/- | रु. १२०/- |
| | | २०० ते ३०० फुटापर्यंत | रु. ९.५०/- | रु. ११४/- |
| | | ३०० फुटावरती | रु. ९/- | रु. १०८/- |

**१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५०% व १००% अतिरिक्त फी आकारण्यात येईल.**

**२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २०% जादा फी आकारण्यात येईल.**

**३) फक्त खाजगी जागेतील होर्डिग्ज यांना जाहिरात फी च्या ३०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.**

**४) दि.०१/०४/२०१२ पासून देण्यात येणा-या किंवा यापूर्वी देण्यात आलेल्या महापालिकेच्या जागेमध्ये फक्त होर्डिग्जकरीता प्रति चौ.फुट/प्रति महिना अ.क्र. १५ प्रमाणे जाहिरात फी दर आकारण्यात येईल.**

**५) दि. १/४/२०१२ पासून पुढे देण्यात येणा-या किंवा यापूर्वी देण्यात आलेल्या महापालिकेच्या जागेमध्ये फक्त कायमस्वरुपी कमानी (ग्रॅन्टी) करिता प्रति चौ. फुट /प्रति महिना रु. १५/- प्रमाणे (अ दर्जाची श्रेणी) जाहिरात फी दर आकारण्यात येईल. यापुर्वी केलेल्या करारनाम्याचा उल्लंघन केलेल्या ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करावी व दोशी ठेकेदारांचे करारनामा रद्द करण्यांत यावा.**

**६) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशिमिरा ते मॅक्सस मॉल भाईंदर पश्चिम या रस्त्यांवर लावण्यात आलेल्या कमानीवर कराराप्रमाणे दिशादर्शक फलक लावणे बंधनकारक राहील.**

वरीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेल्या जाहिरात फी चे दरास दि. १/४/२०१२ पासून लागू करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मनपाने मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि.यांना दिलेल्या मिरा भाईदर क्षेत्रातील दिव्याच्या खांबावर असलेल्या किऑस्क करीता लागणारा विद्युत पुरवठयासाठी स्वतंत्र मीटर लावणे बंधनकारक करण्यात यावे.

तसेच तात्पुरत्या स्वरुपाचे धार्मिक ,सामाजिक सांस्कृतिक, कला, क्रिडामंडळे,शैक्षणिक जाहिराती करीता पोलीस वाहतूक शाखेचा नाहरकत दाखला न घेता विभागप्रमुखांना परवानगी देण्याचे अधिकार देण्याकरीता ही सभा मान्यता देत आहे. याकरीता अंतिम मंजुरीसाठी मा.महासभेस शिफारस करीत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, विजेचे खांबावरील फलक याच्यासाठी जे चार्जेस आपण आता ठरवलेले आहेत. सध्या जे शहरामध्ये विजेचे खांब आहेत. त्याच्यावरुन आपल्याला किती उत्पन्न मिळत? सध्या जे विजेच्या खांब्यावर ॲडव्हरटाईजमेंट लागलेले आहेत.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

प्रती पोल प्रति महिना ३०० रु. आहे.

**अनिल सावंत :-**

आता जे रिलायन्स चे जे पोल आहेत. त्याच्यावरती आपण जे राईट दिलेले आहेत ते ॲडव्हरटाईजमेंटचे त्याचे आपल्याला किती पैसे मिळतात.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्या रिलायन्सच्या पोलच्या आपल्याला ३०० रु. प्रति पोल प्रति महिन्याला मिळतात.

**अनिल सावंत :-**

३०० रु. मिळतात.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडम तुमच्या परवानगीने बोलते आपली महापालिकेची शाळा आहे. आपल्या महानगरपालिका शाळेला म्हणजे भिंतीला होर्डींग्ज लावतात ते बरोबर आहे. ती शाळा आहे. कोणीही त्या भिंतीला होर्डींग्ज लावतात ती मोठी मोठी त्यांनी शाळा सोडून कोठेही लावा. आपल्या शाळेवर
नाही लावा.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

अशा प्रकारे शाळेचे हे केले असेल तर त्यांच्या विरुध्द आम्ही डिफेन्स ऑफ प्रॉपर्टी अंतर्गत नोटीस देऊन कार्यवाही करु.

**नयना म्हात्रे :-**

उप आयुक्त यादव साहेबांना सांगितल की, तुम्ही जी होर्डींग्ज लावलेली आहे. त्याची परमिशन दिली का? त्यांनी आम्हाला सांगितले. आम्हाला जूनपर्यंत परमिशन दिले आहे. जर जुनपर्यंत परमिशन दिली असेल त्यांनी शाळेवर लावलेली आहे. ते आता काढणार कसे. त्यांनीच विचार करायला पाहिजे होता. शाळेचे भिंतीवर आम्ही परमिशन तुम्हाला देणार नाही. परमिशन देतानाच विचार करून दयायला पाहिजे होता.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

यादव यांच म्हणणं असे आहे कि, शाळेच्या भिंतीवर नाही पोलिसांनी त्या स्पेसिफिक जागेवरती परवानगी दिली तिथे लावण्यात आले आहे.

**नयना म्हात्रे :-**

कोणी दिली परवानगी.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

पोलिस अधिकारी कडून पहिली एन.ओ.सी. घेतली नंतर परवानगी घेतली.

**नयना म्हात्रे :-**

पोलिसांनी परवानगी देऊ दया. मी आपल्या महानगरशाळेच बोलते. पोलिस आपली महापालिका चालवतात का?

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

स्थायी समितीची सभा संपल्यावर यादव समक्ष जाऊन पाहणी करुन येतील आणि अशा पध्दतीने चुकीच्या जागी असेल तर त्यांना काढण्यास सांगण्यात येईल.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम आपण कमानीची परवानगी देतेवेळी त्या कमानीवर दिशादर्शक हा जो पोर्शन आहे त्याच्यामध्ये दिशादर्शक मॅप असावा अशी कंडिशन आहेत. पण कुठलीच कमानी ती कंडिशन फुलफिलच करत नाहीत. फ्रन्ट साईट बॅक साईट याच्यापूर्वी पण ठराव मांडलेला आहे. आताच्या ठरावाच म्हणत नाहीए मी याच्या पूर्वीची कमानीची परमिशन देते वेळेस दिशादर्शक नकाशा त्या कमानीवर असावा. अर्ध्या भागावर अशी कंडिशन होती. कंडीशन पाळली जात नाही. आपले अधिकारी काय करतात. अधिकारी परवानगी कशी देतात. त्यांच्यावर काय कार्यवाही केली.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडम, आपल्या शाळेच्या बाजूला होर्डीग्जची परमीशन देऊच नये. आपली महापालिकेची शाळा आहे. एखादी प्रायव्हेट शाळा असेल तर त्या प्रायव्हेट शाळेला लागेल पण आपली महापालिकेची शाळा आहे.

**मा. सभापती :-**

यादव साहेब सुचना लक्षात घ्या. शाळेच्या बाहेर असेल तर काढायला घ्या.

**अनिल सावंत :-**

आणि कमानीच काय? अर्ध्या कमानीवर दिशादर्शक असाव हे कंडिशन आहे पण ते कंडीशन पाळले जात नाहीत.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

ज्या कमानीवर दिशादर्शक अर्ध्या ठिकाणी बोर्ड लावलेला नाही. त्यांना आम्ही एमीजेटली नोटीस देऊ. आणि तशाप्रकारे सक्ती करु तसे नाही केल तर त्यांच कॉन्ट्रॅक्ट .........

**अनिल सावंत :-**

ह्याच्या पुढ त्यांनी काय नाही केल अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे ना ती. स्टँडींगच्या मिटींगमध्ये आम्ही लक्ष दिल म्हणजे करायच का ते अगोदर का नाही केल.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आता लगेच कार्यवाही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

राऊत साहेब, आतापर्यंत जे रस्ता निर्देशन जे लावतात, यादव साहेबांना विचारले होते जे पालन करत नाहीत त्यांच्याकडून रक्कम वसुल करा आणि आता ठरावामध्ये आम्ही तसे नमुद केलेल आहे. म्हणून त्याची खबरदारी घ्यावी कारण लोकांना समजत नाही की गोराई कुठे आहे. एकानीच फक्त लावलेल आहे. तर ह्याची दखल घ्यावी.

**प्रकरण क्र. १३५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात फी चे दर वाढविणेबाबत. (दर निश्चित करणेबाबत)

**ठराव क्र. ११८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ आणि ३९२ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम -२००३ अन्वये जाहिराती व आकाशचिन्ह इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतूद आहे.

त्या अनुषंगे मिरा भाईदर क्षेत्रातील जाहिरातीवरील (जाहिरात फलक,आकाशचिन्ह (होर्डिग्ज), कमानी, किऑस्क, तसेच, व्यापारी /जाहिरात आस्थापनेवरील जाहिराती निऑन साईन, ग्लोसाईन इत्यादी तसेच बँका, दुकानांवरील जाहिरात फलक, तसेच मॉल, शोरुम,पेट्रोल पंप इत्यादी व्यावसायिक ठिकाणांवर प्रदर्शित करण्यात येणाऱ्या जहिराती व अन्य प्रकारच्या जाहिराती) जाहिरात फी चे दर हे मा.स्थायी समिती ठराव क्र.४३, दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३५,दि.१९/०३/२००८ अन्वये सन २००८-०९ मध्ये मंजुरी दिलेल्या दरातील तक्त्यामधील अ.क्र. १,२,३,५,६,७,८,१०,११,१२ मध्ये नमुद केलेल्या जाहिरात दरामध्ये वाढ करण्यात येत नाही. परंतु तक्त्यातील अ.क्र. ४,९,१३,१४ व १५ मध्ये वाढ पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

त्याचा तक्ता खालीलप्रमाणे.

**दि.०१/०४/२०१२ पासून लागू करण्यात आलेले जाहिरात फी चे दरपत्रक**

**(अ)** **तक्ता**

| अ.क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | |
|---|---|---|---|

| | | | प्रति चौ.फुट प्रति महिना | वार्षिक |
|---|---|---|---|---|
| १ | इमारतीच्या भितींवरील जाहिरात (लिखाण) | १० चौ.फुटापर्यत<br>१० चौ.फुटावरील | रु.४/-<br>रु.३/- | रु.४८/-<br>रु.३६/- |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ.फुटावरील | रु.३/- | रु.३६/- |
| ३ | कागदी पोस्टर्स | | | |
| | अ) सिनेमा व व्यापारी | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.१०/- | रु.१२०/- |
| | ब) इतर | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.२/- | रु.२४/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.४/- | रु.४८/- |
| ४ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | १) १.५÷ २.५ प्रति ाै.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.९००/- प्रति महिना प्रति पोल (सर्व आकारमाना करीता) | रु.१०८००/- |
| | | २) २.५÷ ३.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | प्रति महिना/ प्रति पोल (सर्व आकारमाना करीता) | |
| | | ३) २.५÷ ५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | | |
| ५ | दुकानांवरील नावाचे फलक | | निरंक | निरंक |
| | | | निरंक | निरंक |
| ६ | दुकानांवरील जाहिरातीचे फलक | १० चौ.फुटापर्यत | रु.३/- | रु.३६/- |
| | | ११ चौ.फुट ते २० चौ.फुट | रु.४/- | रु.४८/- |
| | | २० चौ .फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| ७ | भिंतीवरील जाहिरात (लिखाण व चित्र) | १० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ८ | वाहनांवरील जाहिरात | १० चौ.फुटापर्यत | रु.१०/- | रु.१२०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ९ | होर्डिग्ज (आकाशचिन्ह)/ (मोठे जाहिरात फलक) (खाजगी जागेत) | २०० चौ.फुटापर्यत | रु.६/- | रु.७२/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुट | रु.५.५०/- | रु.६६/- |
| | | ३०० चौ .फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| १० | बस थांब्यावरील जाहिराती | १ चौ.फुटास | रु.४/- | रु.४८/- |
| ११ | रोड शोज | रस्त्यावर १० ठिकाणापर्यत (प्रति नगास रु.१००) | रु.१००० प्रतिदिन/प्रती रस्ता | |
| | | आकाशातील प्रदर्शन | रु.५००/- प्रती शो | |
| | | एरियल बॅनर्स | रु.५०००/- प्रतीदिन/बॅनर | |
| | | रस्त्यावर हॅडबिल टाकणे/वाटणे | रु.१२५/-प्रति हजारी नग | |
| | | रस्त्यावरील लिखाण | रु.२/- प्रति चौ.फुट प्रति महिना | |
| १२ | चल जाहिरात (ऌद्धत्ध्त्मत्द्) किंवा इलेक्ट्रॉनिक्स स्क्रोलर जाहिरात | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | |
| १३ | चलत जाहिरात | १ ते २०० चौ.फुटापर्यत | रु.३५०/- प्रति दिन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (एल.ई.डी.एल.सी.डी.माधमातून उभारलेले जाहिरात फलक) **(Moving advertisement having multiple display)** | | | |
| | | २०० ते ३०० चौ.फुटापर्यत | रु.३००/- प्रति दिन | |
| | | ३०० चौ.फुटावरील | रु.२५०/- प्रति दिन | |
| १४ | कमानी (कायम स्वरुपी खाजगी जागेत) | १ ते २०० चौ.फुटापर्यंत | रु. ६/- | रु. ७२/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुटापर्यंत | रु. ५.५०/- | रु. ६६/- |
| | | ३०० चौ. फुटावरती | रु. ५/- | रु. ६०/- |
| १५ | होर्डिंग्ज (आकाशचिन्ह) मोठे जाहिरात फलक (महापालिका जागेवरती) | २०० फुटापर्यंत | रु. १०/- | रु. १२०/- |
| | | २०० ते ३०० फुटापर्यंत | रु. ९.५०/- | रु. ११४/- |
| | | ३०० फुटावरती | रु. ९/- | रु. १०८/- |

**१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५०ऽ व १००ऽ अतिरिक्त फी आकारण्यात येईल.**
**२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २०ऽ जादा फी आकारण्यात येईल.**
**३) फक्त खाजगी जागेतील होर्डिग्ज यांना जाहिरात फी च्या ३०ऽ कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.**
**४) दि.०१/०४/२०१२ पासून देण्यात येणा-या किंवा यापूर्वी देण्यात आलेल्या महापालिकेच्या जागेमध्ये फक्त होर्डिग्जकरीता प्रति चौ.फुट/प्रति महिना अ.क्र. १५ प्रमाणे जाहिरात फी दर आकारण्यात येईल.**
**५) दि. १/४/२०१२ पासून पुढे देण्यात येणा-या किंवा यापूर्वी देण्यात आलेल्या महापालिकेच्या जागेमध्ये फक्त कायमस्वरुपी कमानी (ग्रॅन्टी) करिता प्रति चौ. फुट /प्रति महिना रु. १५/- प्रमाणे (अ दर्जाची श्रेणी) जाहिरात फी दर आकारण्यात येईल. यापुर्वी केलेल्या करारनाम्याचा उल्लंघन केलेल्या ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करावी व दोशी ठेकेदारांचे करारनामा रद्द करण्यांत यावा.**
**६) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशिमिरा ते मॅक्सस मॉल भाईंदर पश्चिम या रस्त्यांवर लावण्यात आलेल्या कमानीवर कराराप्रमाणे दिशादर्शक फलक लावणे बंधनकारक राहील.**

वरीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेल्या जाहिरात फी चे दरास दि. १/४/२०१२ पासून लागू करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मनपाने मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि.यांना दिलेल्या मिरा भाईदर क्षेत्रातील दिव्याच्या खांबावर असलेल्या किऑस्क करीता लागणारा विद्युत पुरवठयासाठी स्वतंत्र मीटर लावणे बंधनकारक करण्यात यावे.

तसेच तात्पुरत्या स्वरूपाचे धार्मिक ,सामाजिक सांस्कृतिक, कला, क्रिडामंडळे,शैक्षणिक जाहिराती करीता पोलीस वाहतूक शाखेचा नाहरकत दाखला न घेता विभागप्रमुखांना परवानगी देण्याचे अधिकार देण्याकरीता ही सभा मान्यता देत आहे. याकरीता अंतिम मंजुरीसाठी मा.महासभेस शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण १३६, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वर्सोवा येथे उंच जलकुंभ बांधणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वर्सोवा येथे पाणी पुरवठा विभागाचे ८०००० लिटर क्षमतेचे उंच जलकुंभ आहे. सदर जलकुंभातून वर्सोवा गाव, सरकारी निवास, मॉडर्न झोपडपट्टी, मॉडर्न कंपनी झोपडपट्टी या भागास पाणी पुरवठा केला जातो. सदर जलकुंभाच्या मुख्य टाकीचा स्लॅब कोसळल्यामुळे व टाकीच्या कॉलम व भिंतींना उभे तडे गेल्यामुळे वर्सोवा जलकुंभ अतिशय धोकादायक बनला होता. सबब सदर जलकुंभात पाणी घेणे

आपण मागील वर्षीपासून बंद केले व तेव्हपासून या विभागास बायपासव्दारे पाणी पुरवठा करीत आहोत. बायपासव्दारे पाणी पुरवठा केल्याने पाणी पुरवठा कमी दाबाने व कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे विभागाकडे नागरीकांच्या तक्रारी येणेस सुरूवात झाली आहे.

सदर जलकुंभ बांधणेचे काम शासनाच्या "नागरी पाणी पुरवठा कार्यक्रम नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना सन २०११-१२." या योजनेअंतर्गत करणेत येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूद शासन उपलब्ध करून देणार आहे. वर्सोवा येथे उंच जलकुंभ बांधणेचे कामास रू.४९,८६,०००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदर काम दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत निधी मिळण्याकरीता मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करावयाचा आहे. तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वर्सोवा येथे उंच जलकुंभ बांधणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ११९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वर्सोवा येथे पाणी पुरवठा विभागाचे ८०००० लिटर क्षमतेचे उंच जलकुंभ आहे. सदर जलकुंभातून वर्सोवा गाव, सरकारी निवास, मॉडर्न झोपडपट्टी, मॉडर्न कंपनी झोपडपट्टी या भागास पाणी पुरवठा केला जातो. सदर जलकुंभाच्या मुख्य टाकीचा स्लॅब कोसळल्यामुळे व टाकीच्या कॉलम व भिंतींना उभे तडे गेल्यामुळे वर्सोवा जलकुंभ अतिशय धोकादायक बनला होता. सबब सदर जलकुंभात पाणी घेणे आपण मागील वर्षीपासून बंद केले व तेव्हपासून या विभागास बायपासव्दारे पाणी पुरवठा करीत आहोत. बायपासव्दारे पाणी पुरवठा केल्याने पाणी पुरवठा कमी दाबाने व कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे विभागाकडे नागरीकांच्या तक्रारी येणेस सुरूवात झाली आहे.

सदर जलकुंभ बांधणेचे काम शासनाच्या "नागरी पाणी पुरवठा कार्यक्रम नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना सन २०११-१२." या योजनेअंतर्गत करणेत येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूद शासन उपलब्ध करून देणार आहे. वर्सोवा येथे उंच जलकुंभ बांधणेचे कामास रू.४९,८६,०००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदर काम दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत निधी मिळण्याकरीता मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करावयाचा आहे. तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेला अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या जागेवरील ठेका होर्डीग्ज ग्रुप डी - ४ च्या निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.

**मोहन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ग्रुप डी - ४ (१० होर्डीग) करीता ठेक्याने होर्डिग्ज उभारण्याकरीता दि.०१/०१/२०१२ रोजीच्या दै.लोकमत व दै.फ्री प्रेस जर्नल वृत्तपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द करुन तसेच महापालिकेच्या www.mbmc.abcprocure.com या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करून e-Tendering पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरचे ग्रुप डी-४ (१० होर्डिग्ज) च्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत सदरहू विषय मा.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी आला होता. तरी सदरच्या ठेकेदाराने होर्डिग्जचा दर कमी असल्याने तसेच फेरनिविदा मागविल्यास जास्तीत जास्त दर मनपास प्राप्त होऊ शकतील याकरीता फेरनिविदा मागविण्यात यावी.

उपरोक्त प्रस्तावास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

पहिले जे १० होर्डीग्ज आहेत त्याची माहिती देण्यात यावी.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

पहिले जे १० होर्डीग्ज आहेत. Ultra Out Door निविदा त्यांच्याकडे होते. आणि आता त्यांनी दि. २३/२/२०१२ ला कळवले की, आम्ही याच्यापुढे चालवू इच्छित नाही.

**अनिल सावंत :-**

मालकी पालिकेची झाली ना.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मालकी पालिकेची आहे.

**अनिल सावंत :-**

सध्याची मालकी महापालिकेची आहे तर सध्या त्याच्यावर ॲडव्हरटाईजींग कोण करते?

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यांनी ते १० ही बोर्ड उतरवले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

होर्डीग्जची माहिती स्वतःची झाली. ज्याचा आपण ते देणार त्याचा होर्डीग्ज परत उभी करायची गरज नाही. त्याच होर्डीग्जवर तो करणार.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या जागेवरील ठेका होर्डीग्ज ग्रुप डी - ४ च्या निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२० :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील ग्रुप डी - ४ (१० होर्डींग) करीता ठेक्याने होर्डिग्ज उभारण्याकरीता दि.०१/०१/२०१२ रोजीच्या दै.लोकमत व दै.फ्री प्रेस जर्नल वृत्तपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द करुन तसेच महापालिकेच्या www.mbmc.abcprocure.com या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करून e-Tendering पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरचे ग्रुप डी-४ (१० होर्डिग्ज) च्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत सदरहू विषय मा.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी आला होता. तरी सदरच्या ठेकेदाराने होर्डिग्जचा दर कमी असल्याने तसेच फेरनिविदा मागविल्यास जास्तीत जास्त दर मनपास प्राप्त होऊ शकतील याकरीता फेरनिविदा मागविण्यात यावी.

उपरोक्त प्रस्तावास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे** **अनुमोदन :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३८, मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दावे क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ अन्वये सोनार आस्थापना विरुध्द दाखल करण्यात आलेले फौजदारी गुन्हेबाबत फेरविचार करुन निर्णय घेणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठी मुं.प्र.मनपा अधिनियम चे कलम ३१३ व ३८६ अन्वये परवाना घेणे बंधनकारक आहे. परंतु मनपा क्षेत्रातील ७ सोनार आस्थापना यांनी मनपाचा परवाना न घेता सोनार व्यवसाय चालू ठेवल्यामुळे अधिक्षक मार्केट परवाना विभाग यांच्याकडून त्यांना नोटीस बजावण्यात आली होती. परंतु सदर सोनार आस्थापनांनी सदर नोटीसीची पुर्तता न करता सोनार व्यवसाय चालू ठेवल्यामुळे मा. प्रथम दंडाधिकारी न्यायालय, ठाणे येथे फौजदारी केस क्र. २७०६/०७ नाकोडा ज्वेलर्स, २७०७/०७ नरेन ज्वेलर्स, २७०८/०७ सोनल ज्वेलर्स, २७०९/०७ बाबूभाई ज्वेलर्स, २७१०/०७ श्रीराम, २७११/०७ चिराग, २७१२/०७ संजय यांच्या विरुध्द मनपाच्या वतीने फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदरचे ७ प्रकरण मा.

न्यायालयात मनपाच्या वतीने पाठपुराव्यासाठी प्रलंबित आहेत. सदरच्या तक्रारी मु.प्र.मनपा अधिनियम चे कलम ३९२, ३९९ अन्वये दाखल करण्यात आलेल्या आहेत.

दि. ३०/१२/२०११ रोजी मा. महासभेने ठराव क्र. ९७ अन्वये मनपाच्या विविध आस्थापनांना आकारण्यात येणा-या परवान्यांचे दर कमी केले असल्यामुळे सदर ७ सोनार व्यवसायधारक यांनी मनपाकडून परवाना घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे आर्थिक फायदा होऊन उत्पन्न वाढणार आहे.

मुं. प्रा. मनपाचे कलम ४८१ (१) (आय) अन्वये स्थायी समितींच्या मान्यतेने कोणताही वाद दाखल करणे किंवा चालवणे किंवा महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या नावाने दाखल करण्यात आलेल्या किंवा करण्यात आलेला कोणताही वाद किंवा कोणताही दावा किंवा त्याबाबत तडजोड करणे अशी तरतुद आहे. तसेच ४८१ (१) नुसार आयुक्तांस ज्या कोणत्याही व्यक्तिवर हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी यांच्याविरुध्द अपराध केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला असेल तर त्या व्यक्तिविरुध्दची कारवाई मागे घेण्याचे अधिकार आहेत.

तरी सदर ७ सोनार आस्थापनांनी मनपाकडून परवाना घेऊन मनपासोबत तडजोड करण्याची तयारी दर्शविलेली असल्यामुळे सदर सोनार आस्थापनांकडून मागील सन २००६-२००७ पासून ते आजपर्यंत परवाने दि. १०/१०/२००८ रोजीचा ठराव क्र. ४८ मधील दरानुसार व सन २०११-१२ मधील सदर परवान्यांचे नुतनीकरण दि. ३०/१२/२०११ रोजीच्या महासभेने मंजुर केलेल्या दरानुसार सदर सोनार आस्थापनांनी मनपाकडून परवाने प्राप्त करुन घेतल्यानंतर व सदर ७ क्रिमिनल दावे दाखल करण्याकरिता मनपास झालेला खर्च वसुल केल्यानंतर सदर ७ सोनार आस्थापनांविरुध्द दाखल करण्यात आलेले दावा क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ मागे घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे. व मुं. प्रा. मनपा अधिनियम ४८१ (१) नुसार कारवाई करण्यास आयुक्तांस अधिकार देण्यात येत आहेत.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, प्रशासनाने गोषवारा नाही दिला.

**मा. सभापती :-**

सोनार लोकांनी विनंती केलेली की, आमच्यावर केस आहे तर त्याच्यावर विचार करावा.

**लक्ष्मण जंगम :-**

सभागृहात आहेत की केस कोर्टात पेन्डींग आहे.

**शशिकांत भोईर :-**

न्याय प्रविष्ठ आहे. आपल्याला अधिकार आहे. प्रशासनाने गोषवारा दयायला पाहिजे होता.

**लक्ष्मण जंगम :-**

तसेच मिरा भाईंदर मध्ये ब-याचशा लोकांवर केस दाखल आहे. मग सगळयांचा विचार केला पाहिजे ना. बरोबर ना.

**शशिकांत भोईर :-**

ठाण्याला जायची गरज नाही. स्टँडिंगला आणतील निर्लिखित करतील.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती महोदय, मी याच्या अगोदर म्हणजे २००८ पासुन पत्र व्यवहार करतो. स्थायी समिती समोर करतो, मा. महापौर साहेबांना करतो. उप महापौर आणि आयुक्त साहेबांकडे पण पत्र व्यवहार करतो. हे सगळे त्यावेळेला दावे दाखल केले होते. त्यावेळेला मला सांगितले होते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ गरज आहे. त्या बाबतची तरतुद आहे मागे घेण्याची. म्हणून हा प्रस्ताव मी दिला होता.

**अनिल सावंत :-**

न्याय प्रविष्ठ दावे दाखले. त्यांची परिस्थिती काय आहे. दावे काढून घेण्याचे काम सभागृहाचे आहे. आपल्याला काय अधिकार आहे? असे परस्पर आपण दावे काढून घेवू शकतो का? तस असत तर प्रशासनाने गोषवारा दिला असता ना. प्रशासनाची काय भूमिका आहे?

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने खुलासा करावा.

**सई वडके :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगी बोलते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१३ आणि १७३ अन्वये आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये कुठल्याही प्रकाराची आस्थापना चालवायची असेल तर त्यापूर्वी आपला परवाना घेण गरजेच आहे. तर या ७ सोनार आस्थापना जे आहे. त्यांना नोटीस देऊन सुध्दा सन २००६ मध्ये त्यांनी आपल्याकडून परवाना घेतला नाही. म्हणून आयुक्तांच्या परवानगीने आपण ३९२ आणि ३९९ या कलमान्वये प्रायव्हेट कम्पलेंट ठाणे न्यायालयामध्ये फर्स्ट क्लास मेजिस्टरेट इथे दाखल केली होती. तर त्या

एविडन्सला ते मॅटर पेंडिंग आहे. ॲक्च्युली तायशेट्टे साहेब असताना एविडन्स झाल होत. पण त्यांच दुःखद निधन झाल्यामुळे परत आपल्याला एविडन्स घ्यावे लागते. आता गंभिरराव मॅडमच त्या मॅटरमध्ये एविडन्स चालू आहे. आता जो त्याच्यामध्ये विषय आहे. आपल्याला ४८१ (I) प्रमाणे तडजोड Compromise with the Approval of the Standing Committee. एखादे महानगरपालिका दावे दाखल करते त्यात तडजोड करण्याची प्रोव्हिजन आहे. आणि ४८१(१) खाली आयुक्तांना अशा प्रकारे दाखल करण्यात आलेले क्रिमिनल केसेस मागे घेण्याचे अधिकार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने असा गोषवारा का नाही दिलात. तुम्ही जो खुलासा दिला तो लेखी स्वरुपाच्या माध्यमातुन घ्यायचा होता.

**सई वडके :-**

विषय प्रशासनाकडून आलेला नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

आता याच्यामध्ये नेमक काय केले पाहिजे? तुमची काय भुमिका आहे? प्रशासनाची भुमिका तुम्ही काय म्हणता? तक्रारदार प्रशासन आहे.

**सई वडके :-**

याच्यामध्ये आपली तक्रार अशी होती की, त्यांनी लायसन्स घेणे अपेक्षित आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

लायसन्स घेतले नव्हते म्हणून तक्रार केली. मग, आता कुठल्या बेसवर परत कॉम्प्रो करायचे? कॉम्प्रो मॅटर आहे पण का कॉम्प्रो करायचे? तुमचा बोलण्याचा अर्थ असा होतो की, त्याच्यामध्ये कॉम्प्रोची प्रोव्हीजन आहे. कॉम्प्रो करता येतो.

**सई वडके :-**

साहेब, पण त्याला लायसन्स घ्यावे लागेल.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणजे कॉम्प्रो करण्यासारखी परिस्थिती आहे. म्हणून तुम्ही म्हणता. आता मला सांगा एखादया केसमध्ये कॉम्प्रो नाही आहे. पण त्याच्यामध्ये स्टेटमेंट बदलुन सुध्दा आपल्याला कॉम्प्रो करता येतो.

**सई वडके :-**

स्टेटमेंट म्हणजे?

**लक्ष्मण जंगम :-**

बदलता येते ना. ३२४ मध्ये तुम्ही म्हणता की, कोर्टामध्ये कॉम्प्रो करता येते. ३२५ मध्ये स्टेटमेंट बदलुन कॉम्प्रो करता येतो.

**सई वडके :-**

त्याला कॉम्प्रोमाईज शब्द म्हणता नाही येणार. तो आरोपी निर्दोष सिध्द होवू शकतो. इथे आरोप म्हणजे कॉम्प्रोमाईज करण्याची कायद्यात प्रोव्हिजन आहे. म्हणजे त्यांनी ते लायसन्स घेतले............

**अनिल सावंत :-**

त्यांनी लायसन्स घेतले का?

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही कोर्टामध्ये त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दावे क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ अन्वये सोनार आस्थापना विरुध्द दाखल करण्यात आलेले फौजदारी गुन्हेबाबत फेरविचार करुन निर्णय घेणेकरीता महापालिका प्रशासनाने प्रकरण गोषवाऱ्यासह सादर केले नसल्यामुळे चर्चेकरीता सोनार आस्थापना विरुध्द दाखल करण्यात आलेल्या दाव्याबाबत कोणत्याही प्रकरचा बोध होत नाही व विषय न्यायप्रविष्ठ आहे किंवा सदरचा विषय स्थायी समिती समोर मान्य केल्यास मान्य करणाऱ्या सदस्यांवर कन्डेप्ट ऑफ कोर्टची कारवाई करण्यात यावे.

तरी सदरचा विषय सर्व आस्थापनाविरुध्द दाखल केलेल्या दाव्यासंबंधी सविस्तर गोषवाऱ्यासह पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये सादर करावा, असा मी ठराव मांडत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१३८ करिता २ ठराव आलेले आहे. पहिला ठराव सुचक ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदन भगवती शर्मा दुसऱ्या ठरावाचे सुचक जुबेर इनामदार अनुमोदक लक्ष्मण जंगम अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दावे क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ अन्वये सोनार आस्थापना विरुध्द दाखल करण्यात आलेले फौजदारी गुन्हेबाबत फेरविचार करुन

निर्णय घेणेकरीता महापालिका प्रशासनाने प्रकरण गोषवाऱ्यासह सादर केले नसल्यामुळे चर्चेकरीता सोनार आस्थापना विरुध्द दाखल करण्यात आलेल्या दाव्याबाबत कोणत्याही प्रकरचा बोध होत नाही व विषय न्यायप्रविष्ठ आहे किंवा सदरचा विषय स्थायी समिती समोर मान्य केल्यास मान्य करणाऱ्या सदस्यांवर कन्डेप्ट ऑफ कोर्टची कारवाई करण्यात यावे.

तरी सदरचा विषय सर्व आस्थापनाविरुध्द दाखल केलेल्या दाव्यासंबंधी सविस्तर गोषवाऱ्यासह पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये सादर करावा, असा मी ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. आता मी पहिला ठराव मतदानास टाकत आहे. सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदक श्री. भगवती शर्मा यांच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठी मुं.प्र.मनपा अधिनियम चे कलम ३१३ व ३८६ अन्वये परवाना घेणे बंधनकारक आहे. परंतु मनपा क्षेत्रातील ७ सोनार आस्थापना यांनी मनपाचा परवाना न घेता सोनार व्यवसाय चालू ठेवल्यामुळे अधिक्षक मार्केट परवाना विभाग यांच्याकडून त्यांना नोटीस बजावण्यात आली होती. परंतु सदर सोनार आस्थापनांनी सदर नोटीसीची पुर्तता न करता सोनार व्यवसाय चालू ठेवल्यामुळे मा. प्रथम दंडाधिकारी न्यायालय, ठाणे येथे फौजदारी केस क्र. २७०६/०७ नाकोडा ज्वेलर्स, २७०७/०७ नरेन ज्वेलर्स, २७०८/०७ सोनल ज्वेलर्स, २७०९/०७ बाबूभाई ज्वेलर्स, २७१०/०७ श्रीराम, २७११/०७ चिराग, २७१२/०७ संजय यांच्या विरुध्द मनपाच्या वतीने फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदरचे ७ प्रकरण मा. न्यायालयात मनपाच्या वतीने पाठपुराव्यासाठी प्रलंबित आहेत. सदरच्या तक्रारी मु.प्र.मनपा अधिनियम चे कलम ३९२, ३९९ अन्वये दाखल करण्यात आलेल्या आहेत.

दि. ३०/१२/२०११ रोजी मा. महासभेने ठराव क्र. ९७ अन्वये मनपाच्या विविध आस्थापनांना आकारण्यात येणाऱ्या परवान्यांचे दर कमी केले असल्यामुळे सदर ७ सोनार व्यवसायधारक यांनी मनपाकडून परवाना घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे आर्थिक फायदा होऊन उत्पन्न वाढणार आहे.

मुं. प्रा. मनपाचे कलम ४८१ (१) (आय) अन्वये स्थायी समितींच्या मान्यतेने कोणताही वाद दाखल करणे किंवा चालवणे किंवा महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या नावाने दाखल करण्यात आलेल्या किंवा करण्यात आलेला कोणताही वाद किंवा कोणताही दावा किंवा त्याबाबत तडजोड करणे अशी तरतुद आहे. तसेच ४८१ (१) नुसार आयुक्तांस ज्या कोणत्याही व्यक्तिवर हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी यांच्याविरुध्द अपराध केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला असेल तर त्या व्यक्तिविरुध्दची कारवाई मागे घेण्याचे अधिकार आहेत.

तरी सदर ७ सोनार आस्थापनांनी मनपाकडून परवाना घेऊन मनपासोबत तडजोड करण्याची तयारी दर्शविलेली असल्यामुळे सदर सोनार आस्थापनांकडून मागील सन २००६-२००७ पासून ते आजपर्यंत परवाने दि. १०/१०/२००८ रोजीचा ठराव क्र. ४८ मधील दरानुसार व सन २०११-१२ मधील सदर परवान्यांचे नुतनीकरण दि. ३०/१२/२०११ रोजीच्या महासभेने मंजुर केलेल्या दरानुसार सदर सोनार आस्थापनांनी मनपाकडून परवाने प्राप्त करुन घेतल्यानंतर व सदर ७ क्रिमिनल दावे दाखल करण्याकरिता मनपास झालेला खर्च वसुल केल्यानंतर सदर ७ सोनार आस्थापनांविरुध्द दाखल करण्यात आलेले दावा क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ मागे घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे. व मुं. प्रा. मनपा अधिनियम ४८१ (१) नुसार कारवाई करण्यास आयुक्तांस अधिकार देण्यात येत आहेत. या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांच्या बाजुने मी माझं मतदान करत आहे. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या ठरावाच्या बाजुने ९ मतं पडली आहे. तर त्यांच्या ठराव बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दावे क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ अन्वये सोनार आस्थापना विरुध्द दाखल करण्यात आलेले फौजदारी गुन्हेबाबत फेरविचार करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. १२१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठी मुं.प्र.मनपा अधिनियम चे कलम ३१३ व ३८६ अन्वये परवाना घेणे बंधनकारक आहे. परंतु मनपा क्षेत्रातील ७ सोनार आस्थापना यांनी मनपाचा परवाना न घेता सोनार व्यवसाय चालू ठेवल्यामुळे अधिक्षक मार्केट परवाना विभाग यांच्याकडून त्यांना नोटीस बजावण्यात आली होती. परंतु सदर सोनार आस्थापनांनी सदर नोटीसीची पुर्तता न करता सोनार व्यवसाय चालू ठेवल्यामुळे

मा. प्रथम दंडाधिकारी न्यायालय, ठाणे येथे फौजदारी केस क्र. २७०६/०७ नाकोडा ज्वेलर्स, २७०७/०७ नरेन ज्वेलर्स, २७०८/०७ सोनल ज्वेलर्स, २७०९/०७ बाबूभाई ज्वेलर्स, २७१०/०७ श्रीराम, २७११/०७ चिराग, २७१२/०७ संजय यांच्या विरुध्द मनपाच्या वतीने फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदरचे ७ प्रकरण मा. न्यायालयात मनपाच्या वतीने पाठपुराव्यासाठी प्रलंबित आहेत. सदरच्या तक्रारी मु.प्र.मनपा अधिनियम चे कलम ३९२, ३९९ अन्वये दाखल करण्यात आलेल्या आहेत.

दि. ३०/१२/२०११ रोजी मा. महासभेने ठराव क्र. ९७ अन्वये मनपाच्या विविध आस्थापनांना आकारण्यात येणा-या परवान्यांचे दर कमी केले असल्यामुळे सदर ७ सोनार व्यवसायधारक यांनी मनपाकडून परवाना घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे आर्थिक फायदा होऊन उत्पन्न वाढणार आहे.

मुं. प्रा. मनपाचे कलम ४८१ (१) (आय) अन्वये स्थायी समितींच्या मान्यतेने कोणताही वाद दाखल करणे किंवा चालवणे किंवा महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या नावाने दाखल करण्यात आलेल्या किंवा करण्यात आलेला कोणताही वाद किंवा कोणताही दावा किंवा त्याबाबत तडजोड करणे अशी तरतुद आहे. तसेच ४८१ (१) नुसार आयुक्तांस ज्या कोणत्याही व्यक्तिवर हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी यांच्याविरुध्द अपराध केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला असेल तर त्या व्यक्तिविरुध्दची कारवाई मागे घेण्याचे अधिकार आहेत.

तरी सदर ७ सोनार आस्थापनांनी मनपाकडून परवाना घेऊन मनपासोबत तडजोड करण्याची तयारी दर्शविलेली असल्यामुळे सदर सोनार आस्थापनांकडून मागील सन २००६-२००७ पासून ते आजपर्यंत परवाने दि. १०/१०/२००८ रोजीचा ठराव क्र. ४८ मधील दरानुसार व सन २०११-१२ मधील सदर परवान्यांचे नुतनीकरण दि. ३०/१२/२०११ रोजीच्या महासभेने मंजुर केलेल्या दरानुसार सदर सोनार आस्थापनांनी मनपाकडून परवाने प्राप्त करुन घेतल्यानंतर व सदर ७ क्रिमिनल दावे दाखल करण्याकरिता मनपास झालेला खर्च वसुल केल्यानंतर सदर ७ सोनार आस्थापनांविरुध्द दाखल करण्यात आलेले दावा क्र. २७१२, २७१०, २७११, २७०९, २७०८, २००७, २७०६/२००७ मागे घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे. व मुं. प्रा. मनपा अधिनियम ४८१ (१) नुसार कारवाई करण्यास आयुक्तांस अधिकार देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | १) श्री. शशिकांत भोईर | निरंक |
| २) श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | २) श्री. जुबेर इनामदार | |
| ३) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | ३) श्री. एस. ए. खान | |
| ४) श्री. भगवती शर्मा | ४) श्री. अनिल सावंत | |
| ५) श्रीम. नर्मदा वैती | ५) श्री. लक्ष्मण जंगम | |
| ६) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | ६) श्रीम. मर्लिन डिसा | |
| ७) श्री. मोहन जाधव | ७) श्री. पुरोहित मधुसुदन | |
| ८) श्री. बर्नड डिमेलो | ८) श्रीम. नयना म्हात्रे | |
| ९) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे (सभापती) - कास्टींग वोट | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३९, निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पूर्व व पश्चिमेचा भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वेलाईन छेदून १८०० मि.मी. व्यासाच्या आर.सी.सी. पाईपमधून १४०० मि.मी. व्यासाची पाणी पुरवठयाची पाईप टाकावयाच्या कामाचे निविदा e-Tendering द्वारे मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदा e-Tendering द्वारे भरण्याची मुदत दि. १६/०१/२०१२ रोजी होती. दरम्यान फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे सदर निविदा भरण्याचा कालावधी दि. २४/१/२०१२ पर्यंत वाढविण्यात आला. दरम्यान आणखीन एक निविदा प्राप्त झाली अशा एकूण ०३ निविदा अनुक्रमे १) मे. सुगम कंस्ट्रक्शन प्रा.लि., २) मे. घई कन्स्ट्रक्शन पुणे, ३) आनंद इन्फ्रास्ट्रचर डेव्हल्पमेंट कंपनी, यांनी निविदा भरलेल्या होत्या. सदर निविदेचे Technical Bid दि. २४/०१/२०१२ रोजी ठिक ४.०० वाजता उघडण्यात आले. निविदेमधील Technical Bid

कागदपत्राची छाननी केली असता फक्त मे. घई कन्स्ट्रक्शन, पुणे यांचे Technical Bid तांत्रिक दृष्टया योग्य आहे व उर्वरित दोन निविदाकारांचे Technical Bid, Tender Qualification Criteria fulfill करत नाही. त्यामुळे सदर निविदा भरण्याचा कालावधी दि.०७/०२/२०१२ पर्यंत वाढविण्यात आला. व सदर बाबत वर्तमान पत्रात शुध्दीपत्रक देण्यात येऊन महापालिकेच्या संकेत स्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आले होते. आज दि. ०७/०२/२०१२ रोजी १२.०० वाजेपर्यंत नव्याने कोणीही निविदा भरलेले नाही. तसेच वरील तीन निविदा पैकी मे. घई कस्ट्रक्शन, पुणे यांची निविदा फक्त पात्र होत आहे. त्यामुळे फक्त मे. घई कस्ट्रक्शन, पुणे यांची पात्र एकच निविदेचे Financial Bid दि. ०७/०२/२०१२ रोजी उघडण्यात आले.

| **अ.क्र** | **कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव** | **अंदाजित खर्च/ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | भाईंदर पूर्व व पश्चिमेचा भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वे लाईन छेदून १८०० मि.मी. व्यासाच्या आर.सी.सी. पाईपमधून पाणी पुरवठ्याची १४०० मि.मी. व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणे.<br>**मे. घई कन्स्ट्रक्शन लि. पुणे** | रू.३,८५,०९,५४८/-<br>**प्राप्त दर १५ % जास्तीचे. वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |

सदर काम केल्यामुळे भाईंदर (प.) भागातील पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होणार असल्याने वरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १३९ :-**

निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १२२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पूर्व व पश्चिमेचा भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वेलाईन छेदून १८०० मि.मी. व्यासाच्या आर.सी.सी. पाईपमधून १४०० मि.मी. व्यासाची पाणी पुरवठयाची पाईप टाकावयाच्या कामाचे निविदा e-Tendering द्वारे मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदा e-Tendering द्वारे भरण्याची मुदत दि. १६/०१/२०१२ रोजी होती. दरम्यान फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे सदर निविदा भरण्याचा कालावधी दि. २४/१/२०१२ पर्यंत वाढविण्यात आला. दरम्यान आणखीन एक निविदा प्राप्त झाली अशा एकूण ०३ निविदा अनुक्रमे १) मे. सुगम कंस्ट्रक्शन प्रा.लि., २) मे. घई कन्स्ट्रक्शन पुणे, ३) आनंद इन्फ्रास्ट्रचर डेव्हल्पमेंट कंपनी, यांनी निविदा भरलेल्या होत्या. सदर निविदेचे Technical Bid दि. २४/०१/२०१२ रोजी ठिक ४.०० वाजता उघडण्यात आले. निविदेमधील Technical Bid कागदपत्राची छाननी केली असता फक्त मे. घई कन्स्ट्रक्शन, पुणे यांचे Technical Bid तांत्रिक दृष्टया योग्य आहे व उर्वरित दोन निविदाकारांचे Technical Bid, Tender Qualification Criteria fulfill करत नाही. त्यामुळे सदर निविदा भरण्याचा कालावधी दि.०७/०२/२०१२ पर्यंत वाढविण्यात आला. व सदर बाबत वर्तमान पत्रात शुध्दीपत्रक देण्यात येऊन महापालिकेच्या संकेत स्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आले होते. आज दि. ०७/०२/२०१२ रोजी १२.०० वाजेपर्यंत नव्याने कोणीही निविदा भरलेले नाही. तसेच वरील तीन निविदा पैकी मे. घई कस्ट्रक्शन, पुणे यांची निविदा फक्त पात्र होत आहे. त्यामुळे फक्त मे. घई कस्ट्रक्शन, पुणे यांची पात्र एकच निविदेचे Financial Bid दि. ०७/०२/२०१२ रोजी उघडण्यात आले.

| **अ.क्र** | **कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव** | **अंदाजित खर्च/ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | भाईंदर पूर्व व पश्चिमेचा भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वे लाईन छेदून १८०० मि.मी. व्यासाच्या आर.सी.सी. पाईपमधून पाणी पुरवठ्याची १४०० मि.मी. व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणे.<br>**मे. घई कन्स्ट्रक्शन लि. पुणे** | रू.३,८५,०९,५४८/-<br>**प्राप्त दर १५ % जास्तीचे. वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |

सदर काम केल्यामुळे भाईंदर (प.) भागातील पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होणार असल्याने वरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानूमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४०, निवीदांस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलोः-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | पेणकरपाडा येथिल बॉम्बे बोटल कंपनीपासून शिवशक्तीनगर पर्यंतचा मुख्य रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे.<br><br>**१) मे. आर ॲन्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.**<br>२) मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | रु. ४९,४५,५००/-<br><br><br>**१६.३ % कमी दराने**<br>१२.४५ % कमी दराने |

वरील कामाच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**मा. सभापतीः-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १४० :-**

निवीदांस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १२३ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | पेणकरपाडा येथिल बॉम्बे बोटल कंपनीपासून शिवशक्तीनगर पर्यंतचा मुख्य रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे.<br><br>**१) मे. आर ॲन्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.**<br>२) मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | रु. ४९,४५,५००/-<br><br><br>**१६.३ % कमी दराने**<br>१२.४५ % कमी दराने |

वरील कामाच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानूमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४१, **मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)** सन्मा. नगरसेवक श्री. याकुब कुरेशी यांच्या नगरसेवक निधीतून भाईंदर सेकंडरी शाळेस संगणक पुरवठा करणेबाबत.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १४१ मागे घेण्यांत येत आहे.

**बर्नड डिमेलोः-**

प्रकरण क्र. १४१ मध्ये माझी अशी सुचना आहे की, आपल्या नगरसेवकांनी वारंवार निधी विषयी मागणी केली होती की, आम्हाला विशिष्ट प्रकारची कामे करायची आहे. संत जोजफ शाळेला पण संगणक देण्याचा

विचार आम्ही केला होता. तर हे आता मंजुर केलेला मा.नगरसेवक याकुब कुरेशी यांच्या नगरसेवक निधीतुन भाईंदर सेकंडरी स्कुलला कॉम्प्युटर देत आहोत तर ते कोणत्या आधारावर दिले आहे? मला नकार आणि दुसऱ्याला होकार हे असे का?

**शशिकांत भोईर :-**

गर्व्हमेन्टचा जी. आर. आहे.

**भगवती शर्मा :-**

सगळयांना द्या ह्यांनी अगोदर मागणी केली होती.

**दिपक खांबित :-**

अनुदानित शाळा असेल तरच द्यायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अनुदानित मध्ये पोद्दार शाळेमध्ये तीन वर्ग शाळा चालवते. गुजराती हिंदी आणि इग्लीश अनुदानित नाही. दोन शाळा अनुदानित आहे. तर मग त्या शाळेला मिळेल ना.

**दिपक खांबित :-**

अनुदानितला मिळेल.

**भगवती शर्मा:-**

आमच मत सर्वांना द्या.

**दिपक खांबित:-**

नगरसेवकाच्या प्रभागात शाळा पाहिजे. नगरसेवक निधीची काम जी आहेत आपआपल्या प्रभागात पाहिजे म्हणजे कस की त्या वॉर्डमध्ये प्रभाग क्रमाक १,२,३,४ मध्ये खुलासा व्हायला पाहिजे डिसीजन झाला पाहिजे. नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील कामे सुचवावीत. तर आपआपल्या प्रभागातील म्हणले प्रभाग पकडायचे कि प्रभाग समिती पकडायची...............

**अनिल सांवत:-**

वॉर्डचं पकडायचा समिती नाही नगरसेवकनिधी वॉर्डातच लागला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खांबित साहेब, म्हणजे त्या वॉर्डामध्ये ती शाळा असली पाहिजे किंवा ते काम त्या वॉर्डातच असेल तर करायचे आणि ती शाळा अनुदानिक असली पाहिजे.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी पत्र दिले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आता जो खुलासा केला आहे तो खुलासा तुमच्या बरोबर आहे. कोणी पत्र दिलं त्याच्याबद्दल पण नाही. या नंतर माझ्या वॉर्डात जर अनुदानिक शाळा असेल तर त्यावेळेला...........

**बर्नड डिमेलो :-**

सचिव साहेब, माझी सुचना आहे. प्रकरण क्र.१४१ अन्वये सन्मा. नगरसेवक श्री याकुब कुरेशी यांच्या नगरसेवक निधीतून भाईंदर सेकंडरी शाळेत संगणक पुरवठा करण्याबाबतचा विषय ठेवण्यात आलेला आहे. परंतु, यापूर्वी देखील नगरसेवकांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून संगणक पुरवठा करणेबाबत प्रशासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु, नगरसेवक निधीचा वापर या करीता करता येत नाही असे वेळोवेळी सांगण्यात येते. तरी प्रकरण क्र.१४१ हा विषय स्थायी समितीमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे भविष्यात देखील नगरसेवक निधीतून संगणक पुरवठा करण्यात येणार आहे का? याचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा आणि करावयाचा असेल तर तशी नोंद करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१४२, **मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)** प्रकरण क्र. १४३, **मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)**

**मा. सभापती :-**

सदर दोन्ही प्रकरणाचे अवलोकन करण्यात आले.

**प्रकरण क्र. १४२ :-**

**मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांस मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य | रु.६,००,०००/- | मे. युटीलिटी | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यालय इमारत, प्रभाग कार्यालय/ मा.आयुक्त / मा.महापौर निवास, पुनम सागर येथिल भारतरत्न स्व.इंदिरा गांधी रुग्णालय इ.ठिकाणची वातानुकूलीत यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | इंटरप्रायजेस | |
| २ | मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. ६० मधील ओम शांती टॉवर ते बँक ऑफ इंडिया, शांती प्लाझा बिल्डींग नं. ३७ ते ओम चैतन्य टॉवर, शितल आशिष-२ येथे गटारावर स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू.९,९८,९००/- | मे. राठोड ब्रदर्स | २.५१ % कमी दराने |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १६ मधील सदविचार इमारत ते मेहता इड. इस्टेट पर्यत नाला बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९९,३५०/- | मे. एम.ई.प्राजेक्ट प्रा.लि. | १.८ % कमी दराने |
| ४ | भाईंदर (पूर्व) भाजी मार्केट येथील परब मसाला ते रिलायन्स सबस्टेशन पर्यत सी.सी. गटार बांधुन स्लॅब टाकणे. (सभापती, स्थायी समिती निधी) | रु.८,२५,४५०/- | मे. एम.ई.प्राजेक्ट प्रा.लि. | ३.४२ % कमी दराने |

वरील कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात आले.

**सही/-**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४३ :-**

**मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या कामांच्या प्रस्तावांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १. | भाईंदर (पुर्व) येथील राम अनुज ते राम आनंद इमारतीपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.६,११,१३९/- | मे. मानस कन्स्ट्रक्शन |
| २. | शांती नगर सेक्टर ७ येथील पंप गृहात स्टॅन्ड बाय पंप बसविणे | रू.१९,१७,०००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| ३. | मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर २ येथे इमारत क्र. बी-३ ते सी-५ व इमारत क्र. २० ते १८ पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.९,९५,७०७ /- | मे. रिद्धी एंटरप्राईजेस |
| ४. | भाईंदर (प.) येथील जय अंबे नगर २ येथे बिडाची व पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.५,२२,४४९/- | मे. सुदेशा एंटरप्राईजेस |
| ५. | मिरा रोड (पूर्व) गोरव रेसिडेन्सी इमारतीपासून गोरव सिटी इमारतीपर्यत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.१३,१३,४६२/- | मे. रिद्धी एंटरप्राईजेस |
| ६. | भाईंदर (प) शास्त्री नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | **रू.१०,७४,६०२/-** | श्री सिद्धकृष्णाई मजूर कामगार सह. संस्था. |
| ७. | मनपा क्षेत्रातील विविध ठिकाणी क्लोरीनेशन प्लांट बसविणे | **रू.६,२०,०००/-** | माहुली आदि. मजूर कामगार सह. संस्था. |
| ८. | क्लोरीनेशन प्लांट साठी वार्षिक क्लोरीन सिलेंडर्सचा पुरवठा करणे | **रू.१४,७१,५००/-** | अंबिका मजूर कामगार सह. संस्था. |
| ९. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ११ मधील शिवशक्ती नगर येथील विविध गल्ल्यांमध्ये पिण्याची पाईपलाईन टाकणे | **रू.१४,६४,०२०/-** | श्री ओम जलदाय मजूर कामगार सह. संस्था. |
| १०. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ४५ मधील विमल डेअरी लेन येथे ओमकार बंगला ते न्यु रेश्मा अपार्टमेंट येथे पिण्याची पाईपलाईन टाकणे | **रू.५,९५,७५०/-** | कांचन आदि. मजूर कामगार सह. संस्था. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ११ मधील जैन नगर येथील दया सदन ई इमारतीपासून जय भवानी चाळीपर्यंत पिण्याची पाईपलाईन टाकणे | **रू.१३,३०,७१६/-** | चांगुणा मजूर कामगार सह. संस्था. |
| १२. | शांती पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे | रू.२३,५७,१००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| १३. | सृष्टी मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे | रू.२३,५७,१००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| १४. | शांती नगर सेक्टर ३ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे | रू.२३,८९,२००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| १५. | शांती नगर सेक्टर ८ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची मलनिःसारण केंद्राची देखभाल/ दुरूस्ती करणे | रू.२३,८९,२००/- | मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरींग वर्क्स |
| १६. | जेसल पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे | रू.२३,५७,१००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| १७. | मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे | रू.१८,०८,१००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| १८. | मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ११ येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे | रू.१७,४३,९००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| १९. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर ११, कमला पार्क, नेताजी सुभाषचंद्र बोस, गोडदेव, सिल्व्हर पार्क, अस्मिता, घोडबंदर, डोंगरी व नवघर जलकुंभावरील व्हॉल्व बदलणे | रू.२४,५८,४००/- | मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस |
| २०. | डोंगरी येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे | रू.६,९६,९२८/- | मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरींग वर्क्स |
| २१. | पाली, लाईट हाउस व चवळी येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे | रू.९,०९,६९६/- | मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरींग वर्क्स |
| २२. | मिरारोड (पुर्व) प्लेझंट पार्क येथे मानसरोवर सोसायटी ते सिल्व्हर गार्डन पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.१५,५१,३५७/- | मे. गणेश डेव्हेलोपर्स |

वरील कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ - दुपारी १.०५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**